# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय : ०७१२–२५२२९९१, फॅक्स : ०७१२–२५५५७०१


**–: परिपत्रक :–**

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१८/स/२६३३ दिनांक: ८ फेब्रुवारी, २०१८

संबधितांना सूचित करण्यात येते की, **छत्रपती शिवाजी महाराज यांची ३८८ वी जयंती** विद्यापीठाद्वारे भव्य प्रमाणात **सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात विद्यापीठाचे **कुलगुरू, मा. डॉ. सिद्धार्थविनायक काणे** यांचे अध्यक्षतेखाली व **प्र–कुलगुरू मा. डॉ. प्रमोद येवले** ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात येणार आहे. या प्रसंगी **मा. ॲड. पुरूषोत्तम खेडेकर, संस्थापक अध्यक्ष, मराठा सेवा संघ** ह्यांचे **"छत्रपती शिवाजी महाराज व वर्तमान स्थिती"** ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

मा. कुलगुरूंचे आदेशान्वये आपणास विनंती करण्यात येते की, प्रस्तुत कार्यक्रमास आपल्या विभागातील सर्व विद्यार्थ्यांना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व आपण देखील कार्यक्रमास उपस्थित राहावे. सदर कार्यक्रमाकरिता **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपस्थित राहाणे अनिवार्य** असून कार्यक्रमास उपस्थित होणाऱ्यां शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नोंद सामान्य प्रशासन विभागाद्वारे नोंद पुस्तिकेत घेऊन त्यावर उपस्थितांची स्वाक्षरी घेण्यात येणार आहे. या बाबीची आपल्या विभागातील सर्व संबंधीतांना माहिती द्यावी व सर्व कर्मचारी उपस्थित राहतील याची कृपया दक्षता घ्यावी.

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव